# भारत चीन द्विपक्षीय संबंधातील बदलते प्रवाह

**डॉ. सुखदेव एस. उंदरे , सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

---

भारत व चीन ही दोन आशियातील अतिशय प्राचीन इतिहास लाभलेली राष्ट्रे म्हणून ओळखली जातात. पारंपारिक विचारपरंपरेनुसार दोन शेजाऱ्यांचे बहुदा पटत नाही, म्हणूनच की काय 'शेजाऱ्यांचे भांडण' हा वाक्प्रचार सामाजिक व राजकीय जीवनात प्रचलित असावा. तद्वतच आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रा-राष्ट्रांतील संघर्ष हा सतत सत्तेच्या अधिकाधिक प्राप्तीकरिता चाललेला असतो. विशेषतः शेजारील राष्ट्रांबरोबर भू-राजकीय स्वरूपाचे भांडण हा जगात सर्वत्र आढळणारा प्रकार असून भारत-चीन ही राष्ट्रे देखील याला अपवाद करता येणार नाहीत. उभय राष्ट्रे ही दोन राष्ट्रे भौगोलिक क्षेत्रफळ, प्रचंड लोकसंख्या व भक्कम बाजारपेठ या आधारावर आज जगात अग्रणी म्हणून ओळखली जातात. उभय राष्ट्रातील द्विपक्षीय परराष्ट्र धोरणाची सुरुवात साधारणत: १९५० नंतरच झाली. भारत ब्रिटीशांच्या गुलामीतून १९४७ ला स्वतंत्र झाला तर माओ-त्से-तुंगच्या नेतृत्वातील क्रांतीने १९४९ ला साम्यवादी चीनचा उदय झाला. अशा या दोन्ही नवोदित राष्ट्रांमध्ये परस्परातील सीमावाद, तिबेट प्रश्न व अनेक आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील परस्पर विरोधी मतप्रवाह इत्यादींच्या पार्श्वभूमीवर द्विपक्षीय संबंधांची वाटचाल सुरु झाली. या पार्श्वभूमीवर भारत-चीन मधील अर्थ राजकारण एकीकडे झपाट्याने बदलत असतांना पारंपारीक सीमावाद, आशियाई वर्चस्वाची महत्त्वाकांक्षा व सामरिक राजकारणाला उभयपक्षी कितपत मुरड घालता येऊ शकेल? यावर उभयराष्ट्रांमधील अर्थ-राजकारणाचे भवितव्य अवलंबून असल्याने या संबंधीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण प्रस्तुत शोध पत्रातुन करण्यात आले आहे.

अर्थ-व्यापाराशी संबंधित परस्पर हितसंबंधीय धोरणाचे परराष्ट्र संबंधातील महत्त्व, राष्ट्रा-राष्ट्रांतील आर्थिक परस्परावलंबन व वर्तमान 'खाऊजा' धोरणाने भारत आणि चीन यांच्यातील द्विपक्षीय संबंधांवर व्यापक स्वरुपाचे परिणाम केले आहेत. परस्पर शांतता व सर्व क्षेत्रातील सहकार्याशिवाय आर्थिक विकास शक्य नसल्याची जाणिव संपूर्ण आंतरराष्ट्रीय समुदायाला पटली असून त्यामुळे वाढत्या आर्थिक परस्परावलंबित्वाने राज्या-राज्यांतील युद्धाची शक्यता कमी झाली आहे. युद्ध आणि राजकीय विवादाच्या संघर्षामुळे आर्थिक विकास, प्रगती आणि सहकार्यामध्ये अडथळे निर्माण होतात. परिणामी राजकीय स्वरुपाच्या प्रश्नांना, विषयांना, संघर्षांना आर्थिक सहकार्यापासून वेगळे ठेवण्याची म्हणजेच आर्थिक हितसंबंध व राजकीय हितसंबंध हे परस्परांपासून भिन्न ठेवण्याची मानसिकता राष्ट्रांमध्ये बळावत चालल्याचे चित्र आज दिसून येते.[१] त्यामुळे भारत व चीन मधील परंपरागत विवाद्य मुद्यांऐवजी सहकार्यात्मक धोरण व भूमिकांचा विकास ही बाब स्वाभाविकच म्हणावी लागेल.

भारत व चीन मधील द्विपक्षीय संबंधाचा सुरुवातीचा कालखंड हा सीमावाद, तिबेट प्रश्न आदींनी अत्यंत स्फोटक, संघर्षाचा व तणावग्रस्त होता. १९६२ च्या युद्धाने तर उभयपक्षातील शत्रुत्व भावना अधिकच प्रखर झाली. त्यामुळे भारत चीन या आशियातीलच नाही तर जगातील महत्त्वाच्या बाजारपेठा म्हणून समोर येईपर्यंत उभयपक्षातील परंपरागत वादातील तणाव कायम राहिले. सोव्हिएत रशियाचे विघटन व खासगीकरण, उदारीकरण आणि जगभर घेतलेल्या वेगाच्या परिणामी भारत-चीन परस्पर राजकीय विवादाचे विषय विचाराधीन ठेवून आर्थिक सहकार्याच्या मार्गावर पुढे येत आहेत. एकविसाव्या शतकातील उगवत्या आर्थिक महासत्ता म्हणून भारत व चीन ही दोन राष्ट्रे संपूर्ण जगालाच प्रभावीत करीत आहेत. वर्तमान काळात एकमेव महासत्ता असणारा अमेरिका १९७० पर्यंत चीनला आपला शत्रु मानीत होता. परंतु त्यानंतर मात्र आर्थिक सुधारणांनी चीनने जो आर्थिक विकास साधला, त्यामुळे अमेरिकन उद्योजकांना चीनची अवाढव्य बाजारपेठ गुंतवणूकीसाठी उपलब्ध झाली. त्याचबरोबर १९९१ नंतर भारताने खाजगीकरण, ऊदारीकरण व जागतीकीकरणचा स्विकार केल्यानंतर केलेला विकास हा जागतिक महासत्तेला भारताबरोबर मैत्रीचा हात पुढे करायला बाध्य करीत आहे.

बाली (इंडोनेशिया) मध्ये संपन्न आशियाई राष्ट्रांच्या शिखर संमेलनात भारत व चीनने मुक्त व्यापार क्षेत्र स्थापन करण्याच्या कार्याला वेग देण्याचे ठरविले. २००३ मध्ये प्रधानमंत्री वाजपेयी व चीनचे वेनजिआबाओ यांनी एक अध्ययन समूह स्थापन करण्याचा निर्णय घेतला की, जो आर्थिक सहकार्याशी संबंधित असेल, आणि जो वस्तु आणि सेवाक्षेत्रातील व्यापार, गुंतवणूक व संयुक्त उत्पादन प्रकल्पांना समोर आणेल. भारत व चीनने परस्पर व्यापार दुप्पटीने वाढवून १० अरब डॉलर पर्यंत नेण्याचे निश्चित केले.[२] यावरून उभय देशातील आर्थिक विकासाबाबत असलेली परस्पर प्रतिबद्धता स्पष्ट होते.

उभय देशांनी २००६ मध्ये परस्परांतील व्यापार वृद्धिंगत व्हावा या हेतुने भारत-चीन सीमेवरील नथुला खिंड व्यापारासाठी मुक्त करण्यात आली. त्याचबरोबर नोव्हेंबर २००६ ला चीनचे राष्ट्राध्यक्ष जिंताओ यांच्या भारत भेटीने उभयपक्षी विविध क्षेत्रांमध्ये दहा सहकार्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यामध्ये तत्कालीन २० अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढा व्यापारावरुन २०१० पर्यंत ४० अब्ज अमेरिकी डॉलर्स पर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.[३] जानेवारी, २००८ उभयपक्षात 'भारत व चीन यांच्यादरम्यान २१व्या शतकातील एक समविभाजित स्वप्न'[४] या झालेल्या करारामुळे दोन्ही देशातील व्यापारास बळकटी प्राप्त झाली. भारत-चीन मधील या पारस्पारिक सहकार्य करारामुळेच सन- २०११ पर्यंत उभयपक्षातील व्यापार हा जवळपास ४० अब्ज अमेरिकी डॉलर्सवर पोहोचू शकल्याचे तज्ज्ञ मानतात. दरम्यान भारत व चीनने परस्परांना 'मोस्ट फेव्हर्ड नेशन्स' चा दर्जा देवून जकात कर व अनेकविध व्यापार सवलतींविषयी करार केले. वर्तमान भारतीय प्रधानमंत्री व चीनचे ली केकीआँग यांच्यातील मे, २०१५ च्या भेटीने उभय देशांमध्ये महत्त्वपूर्ण २४ करार झाले. त्यावरुन अर्थ-व्यापारी क्षेत्रातील द्विपक्षीय राजकारण सकारात्मक दिशेने जात असल्याने दोहोंमधील अर्थ-व्यापार १०० अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या पुढे जाण्याची शक्यता बळावली आहे.

भारत व चीन या दोन राष्ट्रांच्या मध्यस्थानी हिमालय असल्याने ही दोन्ही राष्ट्रे शतकानुशतके परस्परांपासून शांतीपूर्ण पद्धतीने दूर ठेवले गेले. भारत व चीन आशियाचे दोन सर्वात मोठे शेजारी देश आहेत. त्यामुळेच उभयपक्षातील संबंध प्राचीन आहेत. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगात ज्या नविन राष्ट्र-राज्य व्यवस्थेचा झपाट्याने उदय झाला. त्यामुळे ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञानासह दळणवळणाच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली. या प्रचंड बदलांनी राष्ट्रे आधुनिक स्वरुपाच्या आर्थिक विकास समृद्धीच्या दिशेने कार्यरत झाली. अशा बदलांच्या

परिणामीच भारत-चीन या उभयपक्षातील परंपरागत विवादाचे मुद्दे काहीसे विचाराधीन ठेवूनच आर्थिक क्षेत्रातील परस्पर हितसंवर्धनावर लक्ष केंद्रीत केले.

चीनच्या आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेने चौथ्या दशकामध्ये प्रवेश केला आहे. या आर्थिक उदारीकरणाच्या कार्यक्रमाचे फलित म्हणून चीनची अर्थव्यवस्था आज जगातील पाच अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. चीनने आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रात अमेरिकेसारख्या महासत्तेला मागे पाडले आहे. ४० टक्के बचतीचा दर आणि २ ट्रिलियन डॉलर्सची गंगाजळी आणि ९ ते १० टक्के विकासाचा दर ही आजच्या चीनच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये आहेत. अमेरिका आणि चीन या दोन देशांमधील व्यापाराने ३०० अब्ज डॉलर्स किंमतीच्या व्यापाराचा टप्पा पार केल्याचे दिसून येते. भारताने चीनच्या एक दशकानंतर म्हणजे १९९१ मध्ये आर्थिक उदारीकरणाचा कार्यक्रम सुरु केला. आज भारताच्या उदारीकरण कार्यक्रमाने तिस·या दशकात प्रवेश केला आहे. १.२ अब्ज लोकसंख्या, ८ टक्के आर्थिक विकासाचा दर व ४०० अब्ज डॉलर्सची गंगाजळी ही भारताची गेल्या दोन दशकांतील आर्थिक प्रगती. ज्यावेळी भारताचा आर्थिक उदारीकरणाचा कार्यक्रम तिस·या दशकात म्हणजे २०२० च्या दशकात प्रवेश करेल त्यावेळी आर्थिक प्रगतीचा नवीन उच्चांक भारताने गाठलेला असेल.[५] परराष्ट्र व्यवहारावरील स्थायी समितीने ४ सप्टेंबर, २०१८ रोजी "डोकलाम, सीमा परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमधील सहकार्यासह चीन-भारत संबंधांवर (Sino-India Relations including Doklam, border situation, and cooperation in international organizations)[५] आपला अहवाल सादर केला.

भारत आणि चीन यांच्यातील आर्थिक प्रतिबद्धता ही भारत-चीन संबंधांना स्थिर करणारी शक्ती आहे. भारत-चीन व्यापार आणि आर्थिक संबंधात गेल्या काही वर्षांत झपाट्याने प्रगती झाली आहे. भारत-चीन व्यापाराच्या मुद्द्यांवर परराष्ट्र सचिवांनी २२ फेब्रुवारी २०१८ रोजी असे स्पष्ट केले कि, वर्ष- २००० मध्ये आमचा द्विपक्षीय व्यापार केवळ ३ अब्ज डॉलर्स येवढा कमी होता. परंतु २०१६ पर्यंत हा व्यापार ७० अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचला, असे असले तरी दोन्ही देशांमधील व्यापार तूट हा मात्र चिंतेचा विषय बनला आहे. कारण २०१६ मध्ये व्यापारी तूट ही ४७.६८ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढी होती.[६]

समितीच्या अहवालानुसार, २०१७ मध्ये भारत आणि चीन यांच्यातील द्विपक्षीय व्यापार 80 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे. तथापि, भारताच्या चिंतेत चीनने लादलेले नॉन टॅरिफ (Non-tariff), अडथळे, मालाचा डंपिंग आणि चीनकडून गुंतवणुकीचा अभाव यांचा समावेश आहे. समितीच्या शिफारशींनुसार सरकारने चिनी कंपन्यांना भारतात अधिक गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित करावे. याशिवाय, चीन बरोबरच्या उच्च पातळीवरील व्यापार अडथळ्यांना कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, ज्यामध्ये मंत्रीस्तरीय संयुक्त आर्थिक गटाचा (Ministerial Level Joint Economic Group) समावेश आहे. समितीने विशेषत: भारत आणि चीन यांच्यातील संबंधांचे सखोल मूल्यमापन सरकारने केले पाहिजे,[७] यावर भर दिला असून चीनबरोबर कशा पद्धतीने व्यवहार करावा याबाबत राष्ट्रीय एकमत होऊ शकेल याचा विचार व्हावयास हवा असे अहवालात म्हटले आहे. समितीने व्यापार लुट व चीन बरोबर केल्या जाणाऱ्या व्यवहाराबाबत भारत सरकारला काही मूल्यमापनात्मक संकेत दिले असले तरी भारत व चीन मधील वर्तमान अर्थ- व्यापारात सुरु असलेली घोडदौड बघता उभय राष्ट्रे ही निश्चितपणे भविष्यातील दोन आर्थिक महान सत्ता म्हणून जागतिक राजकारणाच्या पटलावर उदयमान राहतील हे निर्विवाद आहे.

उपरोक्त तथ्य विश्लेषणावरुन भारत व चीन या दोन बलाढ्य आशियाई राष्ट्रांतील अलीकडच्या काळातील बदलते अर्थ-राजकारण स्पष्ट होते. जागतिकीकरणाचा भविष्यकालीन अंदाज घेऊनच साम्यवादी चीनने जवळपास १९७८-७९ पासूनच आपल्या आर्थिक धोरणात उदारीकरणाचे तत्व स्विकारले, तर १९९० नंतर विशेषकरुन आर्थिक क्षेत्रात भारताने देखील खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा स्विकार केला. आर्थिक व व्यापारी क्षेत्रात दोन्ही देशांना मोठा वाव असल्यामुळे मागील दोन दशकांत भू-राजकीय प्रश्नांत अडकून राहण्याबरोबरच आर्थिक क्षेत्रात परस्पर संबंध वृद्धींगत करण्याचा व्यवहारीपणा उभयपक्षांनी दाखविला आहे. कारण दोन्ही देशांना आपल्या आर्थिक विकासात सातत्य ठेवणे व त्या अनुषंगाने परकीय गुंतवणूक वाढविण्यावर भर देणे गरजेचे बनले होते. युरोपीय व पश्चिमी देशांच्या आर्थिक मॉडेलच्या परिणामी जागतिक बाजार पेठेवर निर्माण झालेल्या प्रभावात आपण मागे पडणार नाही, या काळजीतून इतर राष्ट्रे, जागतिक व्यापारी संघटनांबरोबरच परस्परांतील अर्थ-व्यापार क्षेत्रातील संबंध वृदिंधगत करने व नवीन बाजारपेठांवर आपले वर्चस्व स्थापित करण्यासाठी उभय देशांतीलअर्थ-स्पर्धात्मक वातावरणाने वेग घेतल्याचे स्पष्ट होत आहे. पश्चिमी देशांच्या अर्थ-राजकारणाला शह द्यावयाचा असेल तर भारत-चीन अर्थ-व्यापार हा कोणत्याही भू-राजकीय अडथळयाविना पुढे किती जाऊ शकेल यावरच विशेषतःआशियाच्या अर्थ-राजकारणाचे स्थैर्य व भवितव्य अवलंबून असेल.

**संदर्भ सूची :**


1. देवळाणकर शैलेंद्र, (२०१४), समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. ८३.
2. खन्ना वी.एन., अरोडा लिपाक्षी, भारत की विदेशनीती, विकास पब्लिशिंग हाऊस, नई दिली, चतुर्थ संस्करण २००८, पृ.१८३.
3. देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, २०१०, पृ. २३१.
4. आलम एम. बी., (२०१७), भारताचे परराष्ट्र धोरण आणि द्विपक्षीय संबंध यांचे मुलभूत निर्धारक घटक, बसू रुमकी (संपा.), आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना, सिद्धांत आणि समस्या, SAGE पब्लिकेशंस न्यू दिल्ली, पृ. ४८५.
5. देवळाणकर शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४, पृ. ८३.
6. Committee On External Affairs (2017-18) (Sixteenth Lok Sabha), Ministry Of External Affairs, (2018), Twenty Second Report, Sino-India Relations Including Doklam, Border Situation And Cooperation In International Organizations, Presented To Hon'ble Speaker On 4 September, 2018, Published Under Rule 382 Of The Rules Of Procedure And Conduct Of Business In Lok Sabha. Pg. 44.